मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर आणि मौ.सावली, जि.चंद्रपूर येथील अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींसाठी मंजूर करण्यात आलेल्या प्रत्येकी ७५ विद्यार्थी क्षमतेच्या ४ नवीन वसतीगृहांच्या व्यवस्थापनेकरिता पदनिर्मीतीबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग,

शासन निर्णय, क्र. आवगृ-२०१९/प्र.क्र.२०/का-१२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दि. ०५ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.आवगृ-२०१९/प्र.क्र.२०/का-१२, दि.०८.०३.२०१९.
२. नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरूज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्च स्तरीय समितीच्या सोमवार दि.०८.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे दि.०३.०८.२०१९ रोजीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर आणि मौ.सावली, जि.चंद्रपूर येथे अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता ७५ क्षमतेची प्रत्येकी १ याप्रमाणे ४ नवीन वसतीगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर ४ नवीन वसतीगृहांसाठी २० नवीन पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास उच्च स्तरीय समितीने दि.०८.०७.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर ४ नवीन वसतीगृहांचे व्यवस्थापन करण्याकरिता नवीन पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मौ.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर आणि मौ.सावली, जि.चंद्रपूर येथे अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता ७५ क्षमतेच्या प्रत्येकी १ याप्रमाणे ४ नवीन वसतीगृहांच्या व्यवस्थापनाकरिता खालीलप्रमाणे ८ नवीन पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार)	प्रत्येक वसतीगृहांसाठी पदसंख्या	पदसंख्या
		अ) नियमित पदे		
१	गृहपाल (गट-क)	३८६००-१२२८०० (S:१४)	१	४
२	कनिष्ठ लिपीक (गट-क)	१९९००-६३२०० (S:६)	१	४
		एकूण	२	८

सदर ८ नियमित पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर ४ नवीन वसतीगृहांसाठी शिपाई, पहारेकरी व सफाईगार या खालील सेवा त्यापुढे नमूद मनुष्यबळाच्या मर्यादेत गरजेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यात याव्यात.

अ.क्र.	सेवा	संख्या	एकूण ४ वसतीगृहांसाठी
१	शिपाई	१	४
२	पहारेकरी	१	४
३	सफाईगार	१	४
	एकूण	**४**	**१२**

४. सदर पदांच्या वेतनाकरिता येणारा खर्च मागणी क्र.टी-५, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१), जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)(५९)मुलांसाठी व मुलींसाठी शासकीय वसतीगृह (राज्यस्तर योजना) (कार्यक्रम), (२२२५ D७२५) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१९३/१९/आपुक, दि.२२.०५.२०१९ अन्वये तसेच नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरूज्जीवन व पदांच्या आढाव्याबाबत दि.०८.०७.२०१९ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१६१६४२०३५६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan
Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.09.16 16:52:51 +05'30'

(सु.ना.शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मंत्री, वित्त व नियोजन, वने यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
११) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
१२) जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
१३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर/चिमूर.
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
१५) सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती (कार्यासन - १२)